# मा.श्री.अटल बिहारी वाजपेयी

(दि.२५ डिसेंबर, १९२४ - १६ ऑगस्ट, २०१८).

(अल्प परिचय)

श्री.अटल बिहारी वाजपेयी हे थोर राजकीय नेते, मुत्सद्दी, कवी व भारताचे माजी पंतप्रधान. श्री.वाजपेयी यांचा जन्म दि.२५ डिसेंबर, १९२४ रोजी मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. श्री.वाजपेयी यांनी व्हिक्टोरिया कॉलेज ग्वाल्हेर आणि डी. ए. व्ही कॉलेज कानपूरमधून महाविद्यालयीन शिक्षण घेऊन हिंदी, संस्कृत व इंग्रजी विषयात बी.ए. पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. तसेच पुढे राज्यशास्त्र विषयात एम. ए. पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली.

सन १९४२ मधील छोडो भारत आंदोलनातील सहभागावरून त्यांना अटक करण्यात आली होती. सन १९५७ च्या भारतीय सार्वत्रिक निवडणुकीत वाजपेयींनी लोकसभेसाठी पहिल्यांदा निवडणूक लढवली व ते बलरामपूरमधून संसदेचे सदस्य म्हणून निवडून आले.

श्री.अटल बिहारी वाजपेयी चार दशकांहून अधिक काळ भारतीय संसदेचे सदस्य होते. ते नऊ वेळा लोकसभेवर, तर दोनवेळा राज्यसभेवर निवडून आले होते. सन १९९६ च्या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आला. सन १९९६ ची लोकसभा त्रिशंकू राहिली. सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाला सत्तास्थापनेसाठी निमंत्रण मिळाले व श्री.वाजपेयी देशाचे पंतप्रधान झाले. सन १९९८ मध्ये श्री. वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणून पुन्हा शपथ घेतली. सन १९९८ च्या अखेरीस विश्वासमत प्रस्तावावेळी वाजपेयी सरकार अवघ्या एका मताने पडले. सन १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत श्री.वाजपेयी यांनी तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

श्री.वाजपेयी पंतप्रधान असताना भारताने सन १९९८ मध्ये पोखरण अणुचाचण्या केल्या. श्री.वाजपेयींनी पाकिस्तानशी राजनैतिक संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला, पाकिस्तानने लादलेल्या कारगिल युद्धात भारतीय लष्कराने पाकिस्तानी घुसखोरांना यशस्वीपणे हुसकावून लावत जोरदार प्रत्युत्तर दिले. दि.२६ जुलै, १९९९ रोजी हे युद्ध अधिकृतपणे संपुष्टात आले. हा दिवस भारतीय इतिहासात कारगिल विजय दिवस म्हणून ओळखला जातो. श्री. वाजपेयींच्या सरकारने अनेक देशांतर्गत आर्थिक आणि पायाभूत सुधारणा सुरू केल्या.

राजकारणासोबतच श्री.वाजपेयी एक सर्जनशील कवी व लेखक होते. त्यांची संसदेत गाजलेली काही भाषणेही पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली आहेत.

सन १९९२ मध्ये भारत सरकारने भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण देऊन सन्मानित केले होते. नरेंद्र मोदींच्या प्रशासनाने सन २०१४ मध्ये श्री.वाजपेयींचा वाढदिवस, २५ डिसेंबर हा “सुशासन दिन” म्हणून साजरा केला जाईल, अशी घोषणा केली. सन २०१५ मध्ये श्री.अटल बिहारी वाजपेयी यांना “भारतरत्न” हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरविण्यात आले.

*****

(स्त्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)